
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | गुरुवार दि.२३ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २३४ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Thrusday 23 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 234 | Pages 4 | Rate 4 Rs




# १५ ऑगस्टपर्यंत रेल्वे सुरू झालीच पाहिजे; रस्त्यातील ब्लॅकस्पॉट कमी करा

## रेल्वे व महामार्ग आढावा बैठकीत खा.बजरंग सोनवणे यांच्या अधिकाऱ्यांना निर्देश

### रेल्वे कामांचा घेतला सखोल आढावा

रेल्वे विभागाच्या आढाव्यात अहमदनगर–बीड–परळी रेल्वेमार्गाच्या सर्व टप्प्यांवरील कामांचा सखोल आढावा घेण्यात आला. ३१ मे पर्यंत परळीपर्यंत रेल्वे ट्रॅक आणि जून महिन्यात रेल्वे चाचणी होणे अपेक्षित आहे.आष्टी स्थानकास वीज जोडणी, बीड–वडवणी, वडवणी–सिरसाळा व सिरसाळा–परळी या टप्प्यांतील सिव्हिल वर्क, भूसंपादन, अर्थवर्क व रुळ अंथरण्याच्या कामांबाबत माहिती घेण्यात आली. बीड–नगर–मुंबई व बीड–नगर–पुणे इंटरसिटी सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. आष्टी, पाटोदा, शिरूर व बीड तालुक्यातील अनेक गावांमध्ये रोड ओव्हर ब्रिज उभारण्याची गरज मांडण्यात आली असून, त्यासाठी प्रस्तावांची सद्यस्थिती विचारण्यात आली. बार्शीनाका येथे अतिरिक्त रेल्वे थांबा, पालवन व बार्शी नाका स्थानकांसाठी पार्किंग सुविधा, तसेच सर्व स्थानकांसाठी सोलर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे निर्देश देण्यात आले. उस्मानाबाद–बीड–औरंगाबाद नवीन रेल्वेमार्ग सर्वेक्षण, प्रकल्पाची व्यवहार्यता, तसेच प्रलंबित भूसंपादन प्रकरणे तातडीने निकाली काढण्यावर भर देण्यात आला.

### पालखी मार्गाबाबत नाराजी

१ पैठण–पंढरपूर मार्गावरील डोंगरकिन्ही ते पारगाव (अनपटवाडी) या भागातील अत्यंत खराब रस्ता, मळेकर घाटातील अपूर्ण कामे, मोठ्या भेगा व अपघातांची मालिका यावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

२ पाटोदा शहरातील अपूर्ण रस्ता काम निकषानुसार पुन्हा करण्याचे, एजन्सीवर कारवाई व अनावश्यक खर्चाची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले.

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

मागील दोन वर्षात रेल्वे कामाला गती दिलेली आहे. आता रेल्वेचे काम युध्द पातळीवर करून १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत पुणे ते परळी रेल्वे धावलीच पाहिजे, शिवाय बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गासहित ग्रामीण मार्गावरील ब्लॅकस्पॉट कमी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग आढावा बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या हॉलमध्ये रेल्वे आणि राष्ट्रीय महामार्ग आढावा बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीत विविध प्रलंबित कामे, भूसंपादन, निकृष्ट दर्जा, अपघातप्रवण ठिकाणे व नागरिकांच्या अडचणी यांसह सर्वच मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी उपस्थित होते. खा.बजरंग सोनवणे यांनी बैठकीत अंबाजोगाई, केज, नेकनूर, मांजरसुंबा, पाटोदा व माजलगाव शहरांभोवती बायपास व उड्डाणपूल उभारण्याचा मुद्दा उपस्थित केला. अपघातप्रवण ठिकाणांची तातडीने दुरुस्ती, पिंपळा धायगुडा–लोखंडी सावरगाव–केज–मांजरसुंबा–पाटोदा–चुंबळी फाटा हा रस्ता दुहेरी करणे, तसेच अंबाजोगाईतील यशवंतराव चव्हाण चौकात फूटओव्हर ब्रिज उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. सुरत–चेन्नई राष्ट्रीय महामार्गासाठी आवश्यक भूसंपादनाची सद्यस्थितीही तपासण्यात आली. खरवंडी–मादळमोही–पाडळसिंगी–गढी–माजलगाव मार्गावरील खराब रस्त्यामुळे होत असलेल्या अपघातांबाबत तक्रारी येत आहेत. तालखेड फाटा, शृंगारवाडी फाटा यांसह विविध ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. माजलगाव–धारूर–केज (रामा ५४८ सी) रस्त्याचा दर्जा अत्यंत खराब असल्याने संबंधित एजन्सीकडून तातडीने दुरूस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. धारूर घाटातील थेटेगव्हाण पर्यायी मार्ग, तसेच बर्दापूर–लोखंडी सावरगाव दुहेरीकरणाच्या निविदांबाबत माहिती घेण्यात आली. पाटोदा व आष्टी तालुक्यातील अंमळनेर–टाकळी काजी तसेच गेवराईतील राक्षसभुवन फाटा–उमापूर–शेवगाव या रस्त्यांना राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.





### बीडमधील रस्त्यांच्या कामा बाबत अधिकारी फैलावर

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका रस्त्याचे काम अतिषय संत गतीने सुरू असल्यामुळे खा.बजरंग सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. माझ्या बीडमधील लोकांना होत असलेला त्रास तात्काळ कमी केला नाही तर कोणाचीही गय करणार नाही, असा इशारा दिला.

### घाटनांदूर रेल्वेथांब्यासाठी प्रस्ताव द्या

घाटनांदूर रेल्वे स्टेशनवर विविध रेल्वेंना थांबा देणे आवश्यक असून त्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी रेल्वे थांबा देणेबाबत तातडीने केंद्राकडे प्रस्ताव सादर करावा, त्यासाठी मी पाठपुरावा करेल, अशा सुचना खा.सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

### गंभीर मुद्दयावरही फोकस

विविध गावांमध्ये रेल्वेमुळे शेतीमाल वाहतुकीस अडथळे, पुलाखाली साचणारे पाणी, रस्त्यांचे अपूर्ण काम, लाईटची सुविधा नसणे, तसेच भूसंपादनातील अनियमितता व भ्रष्टाचाराबाबतही गंभीर मुद्दे उपस्थित करण्यात आले. रायमोहा, शिरापूर, मोरजळवाडी, गोमळवाडा, विघ्नवाडी, नागरेचीवाडी आदी ठिकाणांतील स्थानिक समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.


# कानडी माळी येथे ‘दिया स्पोर्ट्स अकॅडमी’चे भव्य उद्घाटन; आयएस ,आयपीएस मान्यवरांची उपस्थिती

### ग्रामीण भागातील युवकांना दर्जेदार क्रीडा प्रशिक्षण मिळावे हाच उद्देश–डॉ.दिनकर राऊत

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

तालुक्यातील कानडी माळी येथे ‘दिया स्पोर्ट्स अकॅडमी’च्या भव्य उद्घाटन सोहळ्याचे आयोजन शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले आहे. लाहुरी रोड, कानडी माळी (ता. केज, जि. बीड) येथे हा कार्यक्रम पार पडणार असून, परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या अकॅडमीचे उद्घाटन जिल्हाधिकारी बीड श्री. विवेक जॉन्सन (IAS) यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जि.प. बीडचे सीईओ श्री. जितीन रहमान (IAS), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगरचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुकरे, सोलापूर जिल्हा न्यायाधीश श्री. सुरज केंद्रे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक बीड श्री. सचिन पांडकर तसेच केजचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वेंकटराम (IPS) उपस्थित राहणार आहेत.या उपक्रमासाठी डीएसएचे सचिव डॉ. दिनकर राऊत, अध्यक्ष श्री. डी.बी. माळी तसेच मुख्य प्रशिक्षक श्री. अझहर शेख यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. ग्रामीण भागातील युवकांना दर्जेदार क्रीडा प्रशिक्षण मिळावे, त्यांच्या कौशल्याला वाव मिळावा आणि भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडू घडावेत, हा या अकॅडमीमागील मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमास परिसरातील क्रीडाप्रेमी, पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमास प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




# पत्नीला माहेरी ठेवल्याचा राग; नराधमाने घर पेटवून लाखांचे नुकसान केले! धडगावात खळबळ

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी | मोलगी**

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातून एक अत्यंत संतापजनक बातमी समोर आली आहे. आपल्या पत्नीला माहेरी ठेवल्याच्या रागातून एका नराधमाने थेट घर पेटवून दिल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण आगीत फिर्यादी आणि त्यांच्या शेजाऱ्याचे मिळून तब्बल १ लाख १० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना १६ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ४ वाजताच्या सुमारास कुंडल महुपाडा गावात घडली. संशयित मिथुन भाईदास पाडवी (राहणार खडक्याचा पाटीलपाडा) याची पत्नी फिर्यादी लिलाबाई डुमडा पाडवी यांच्याकडे राहत होती. माझी पत्नी माझ्याकडे का पाठवत नाहीस? या कारणावरून आरोपीने लिलाबाई पाडवी यांना शिवीगाळ केली आणि त्यांचे घर जाळून टाकण्याची धमकी दिली. त्यानंतर त्याने क्रूरतेचा कळस गाठत घर पेटवून दिले.आरोपीने पेटवलेली आग इतकी भीषण होती की, तिची झळ शेजारी राहणाऱ्या सुभाष गिब्या वळवी यांच्या घरापर्यंत पोहोचली. या आगीमध्ये दोन्ही घरांचे प्रचंड नुकसान झाले आहे.


यात लिलाबाई पाडवी यांचे १५ क्विंटल ज्वारी, ५० किलो तूर, अन्नधान्य, लाकडी ढोल आणि घराचे साहित्य असे एकूण ६० हजार रुपयांचे नुकसान झाले. तर शेजारी सुभाष वळवी यांचे ९ क्विटल तांदूळ, २ क्विंटल ज्वारी, सेंट्रिंग कामाचे सामान आणि घराचे साहित्य असे एकूण ५० हजार रुपयांचे नुकसान झाले.दोन्ही घरे मिळून एकूण १ लाख १० हजार रुपयांचे शेतमाल आणि संसारोपयोगी वस्तू आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या आहे. या प्रकरणी लिलाबाई पाडवी यांच्या तक्रारीवरून धाडगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३२६ (ग) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार संजय दौलत माळी यांनी गुन्हा नोंदवला असून, पोलीस उपनिरीक्षक राहुल भिलाजी पाटील या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. सध्या आरोपी अद्याप फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.अतिशय क्षुल्लक कारणावरून घर पेटवून देऊन गरीब कुटुंबांचे नुकसान करणाऱ्या आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे

# ‘एमटीडीसी’ मार्फत हरिहरेश्वर येथे खगोल दर्शन महोत्सवाचे २४ ते २६ एप्रिल २०२६ रोजी आयोजन–पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासन, पर्यटन विभागामार्फत आंतरराष्ट्रीय ‘डार्क स्काय सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर ‘खगोल दर्शन महोत्सव २०२६’चे आयोजन २४, २५ व २६ एप्रिल २०२६ रोजी रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर येथे करण्यात आले आहे.या पर्यटन महोत्सवात खगोलप्रेमी व पर्यटकांनी सहभागी व्हावे असे आवाहन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी), स्ट्रॉनइरा आणि डार्क स्काय इंटरनॅशनल यांच्या विद्यमाने डार्क स्काय सप्ताह हा उपक्रम राबविण्यात येत आहे, तसेच स्ट्रॉनइराच्या संस्थापिका व संचालिका श्वेता कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून स्टारगेझिंग सत्रांचे आयोजन करण्यात येत असून खगोल अभ्यासक, विद्यार्थी व पर्यटनप्रेमींसाठी हा एक अनोखा, ज्ञानवर्धक व अनुभवसमृद्ध उपक्रम ठरणार आहे. हरिहरेश्वर हे मुंबईपासून सुमारे चार तासांच्या अंतरावर वसलेले शांत, निसर्गरम्य आणि आध्यात्मिक महत्त्व असलेले कोकणातील पर्यटनस्थळ असून समुद्रकिनारे, हिरवीगार डोंगररांग आणि प्रसिद्ध हरिहरेश्वर मंदिरामुळे ‘देवघर’ म्हणून ओळखले जाते. येथे असलेले एमटीडीसी हरिहरेश्वर रिसॉर्ट समुद्रकिनाऱ्याजवळ व शांत परिसरात वसलेले असून येथे पर्यटकांसाठी प्रीमियर सूट, कॉटेज, सी–फेसिंग कॉटेज व एक्झिक्युटिव्ह रूम्ससह आरामदायी निवास व्यवस्था उपलब्ध आहे. हरिहरेश्वरची व्यापक प्रचार व प्रसिद्धी होऊन देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी या ठिकाणाला अधिक पसंती द्यावी, या उद्देशाने हरिहरेश्वर येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त हा उपक्रम विशेषरित्या आयोजित करण्यात येत असून पर्यावरणपूरक व अनुभवाधारित पर्यटनाला चालना देणे हा यामागील प्रमुख उद्देश आहे.महाराष्ट्रात प्रथमच होणाऱ्या या महोत्सवात स्टारगेझिंग (आकाश निरीक्षण) सत्रे, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली खगोल विषयक संवादात्मक प्रदर्शने, प्रकाश प्रदूषण व ‘डार्क स्काय’ संवर्धनावरील माहितीपर उपक्रम तसेच पर्यावरण जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये प्रकाश प्रदूषणाचे दुष्परिणाम, नैसर्गिक अंधाराचे महत्त्व तसेच पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. खगोलशास्त्र, पर्यावरण व पर्यटन यांची सांगड घालत हा महोत्सव पर्यटकांना एक वेगळा अनुभव देणार आहे. या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई व पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, पर्यटन विभागाचे प्रधानसचिव संजय खंदारे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश र. गटणे यांनी केले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, विभाग प्रमुख मानसी ताटके, तसेच प्रादेशिक व्यवस्थापक, रत्नागिरी दीपक माने यांच्या समन्वयातून आवश्यक नियोजन व अंमलबजावणी करण्यात येत असून, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे सक्रिय सहकार्य लाभत आहे.



# संपादकीय

## वाचू आनंदे

अपरिमित कौशल्याची कुशाग्र बुद्धी ही मानवाला लाभलेली सर्वात मोठी देणगी होय, जिच्या जोरावर परग्रहावर जाऊन आपण आपला ठसा उमटलेला आहे. मानवी जन्माप्रसंगी वाढणाऱ्या इतर अवयवांबरोबर संवेदना जागृत करत मेंदूच्या बुद्धीची कार्यप्रणाली जोर धरते. अभ्यासाने, कौशल्यपणाला लावून ज्ञानार्जनाद्वारे बुद्ध्यांक वाढवता येतो हा आजवरचा शोधप्रवास ज्याला आधाराची पुष्टी देता येते. ज्ञान मार्गात आवश्यक पर्याप्त खुराकाची मात्रा मेंदूला प्राप्त झाली की, बुद्धीला धार येते. बुद्धीला धार देणाऱ्या स्त्रोतापैकी वाचन हे अतिशय महत्त्वाचे स्त्रोत आहे, ज्याला आपण मनाचे अन्न म्हणूया. मनाच्या अन्नासाठी वाचनासारखा दुसरा मार्ग सध्यातरी नाही. वाचनासाठी पुस्तकांचा विषय महत्त्वाचा मानला जातो. आजच्या एआयच्या काळात वाचनासाठी मार्गदर्शक तक्ते आहेत. सवलती, सोयी–सुविधा वाट पाहत उभ्या आहेत. पुस्तकाच्या वाचनाने, सौहार्दपूर्ण संवादान्वये मानवाचे मानसिक स्वास्थ्य सुधारते. त्याला चालना मिळते. त्यामुळे पुस्तकांशी मैत्री ही केवळ मैत्री न राहाता त्यातून प्रगतीचे मार्ग खुले होतात. अभ्यासाने ज्ञानाची दालन खुली करणारी पुस्तकं सामाजिक तसचं वैचारिक बैठकीचा आनंद देतात. वाचनालयातील विविध पुस्तके आपल्यासोबत संवाद साधण्यास, आपल्यात परिपक्वता आणण्यास उत्सुक आहेत. तेव्हा येणाऱ्या काळात वाचाल तर वाचाल मोहिमेसाठी मोठी शक्ती कार्यान्वित करायला हवी. पुस्तकांबाबत अनिल अवचट म्हणतात, अतृप्तीच्या भांड्यात एक थेंब तृप्तीचा मिसळला की, निर्माण होणारं तृप्तीचे दही घट्ट असेल. तसंच पुस्तकांच आहे. पुस्तकांच्या बाबतीत धारणेचा आग्रह धरला की पुस्तकचं काय, पण एखादं महत्त्वाचं सूत्र किंवा वाक्यसुद्धा आपली दिशा ठरवू शकेल. पुस्तकांच्या दुनियेत रमणं काहींना छान जमतं. ज्यांना जमतं ती लोक भाषा, विचार, विषय, संस्कृती पुढं नेण्याचं काम करतील. पुस्तकं वाचून काढण्याचा आणि पुस्तक हाताळण्याचा बुद्धिवर्धक व्यायाम ज्याला उमगेल त्याचा सर्वांगीण सुंदर विकास होईल. दिसामाजी काहीतरी लिहीत जावे। प्रसंगी अखंडित वाचीत जावे। रामदास स्वामींची विचारधारा हेचं तर सुचवते. आई, परिवारानंतर सहवासात आलेली माणसं, गुरू, ग्रंथ, शाळा आणि पुस्तक आपल्या जीवनावर व्यापक प्रकाश टाकतात. पुस्तके आपली मित्र असतात. इतरांची पुस्तके वाचताना त्यातून प्रेरणा मिळते. जीवनात काहीतरी मिळवायची उमेद वाढते आणि पुस्तकदिनाच्या निमित्ताने जीवन समृद्ध करणाऱ्या दिशादर्शक मार्गावर नवी मानसिक स्थैर्याची फळी निर्माण होण्याची खात्री पटते. पुस्तकदिनाच्या मूळ उद्दिष्टांचा मागोवा घेता एक गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे वाचकाला वाचनाच्या संधीबरोबर आनंदाचं सूत्र, अपयशाचं संकट आणि निराशेला सामोरं जाण्याचं ध्येय हिचं पुस्तक देतात. पण प्रोत्साहित व्यक्तींमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी इच्छाशक्ती हवी, तेव्हाच वाचक, वाचन आणि पुस्तकांसाठीच्या प्रयत्नाला बळ येईल. पुढे हा विश्वास घेऊन विविध उपक्रमांद्वारे पुस्तक दिन संस्मरणीय करण्याचा कल वाढवावा लागेल. पुस्तकं वाचन रंजक होण्यासाठी स्वागतार्ह मुद्दा म्हणजे... आवडत्या पुस्तकातलं एखादं आवडीचं पात्र निवडून अभिनयातून ते सादर करण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून जगण्याच्या मार्गावरील परस्पर संवाद पक्का होऊन लेखकाच्या कलाकृतीला जवळून अनुभवता येईल. पुस्तकांमुळे वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचा हा एक उत्तम पर्याय होऊ शकेल.वाचनाने पूर्णत्व येतं. संवादाने सजगता येते तर लिखाणाने अचूकता येण्याची किमया पुस्तकात सापडते. कादंबरी, कथांचे सामायिक वाचन केल्याने वाचनाची आवड वृद्धिंगत होऊन तिच्या कक्षा रुंदावतील. नेहमीच्या जगण्यात फरक पडेल. काय चांगले, काय वाईट याबाबत इतरांना आपण खुलासा करू. वाचलेल्या पुस्तकांच्या नोंदींसह विस्तृत श्रेणीतील पुस्तक वाचण्यासाठी आपण इतर वाचकांना प्रोत्साहित करू. विचार करून वाचलेल्या आणि वाचून विचार केलेल्या पुस्तकाद्वारे शिक्षण आणि आनंद दोन्हींचा लाभ घेता येईल. जगभरातील विस्तृत ज्ञानगंगेच्या प्रवाहात सदैव रस असलेल्यांना नवीन क्षेत्रांचा परिचय करून देण्यासाठी पुस्तकं परिणामकारक ठरतील. शहाणपणाचा निर्झर वाचनानंद म्हणून जागतिक पुस्तक दिन ओळखला जातो. वाचनामुळे विद्यार्थ्यांसह प्रत्येक व्यक्ती सक्षम होऊ शकेल. वाचनाच्या सवयीने इतरांना प्रोत्साहित करण्याचा चांगला मार्ग म्हणून आपण त्याकडे पाहू शकतो. पुस्तक वाचन असो वा मोबाईल वाचन असो वा संगणकीय वाचन! नाट्य, संगीत, कला, व्यवसाय, उठावदार व्यक्तिमत्त्व विकासात वाचन महत्त्वाची भूमिका बजावते. आपली स्मरणशक्ती, आपला शब्दसंचय, व्याकरणाची शुद्धता सुधारण्यास वाचन मदत करते. पुस्तक आणि वाचक हे दोघे हातात हात घालून आले की साहित्य भरभराटीला येतप; परंतु वाचनापेक्षा प्रतिक्रिया देण्याच्या प्रक्रियेला आजकाल जोर येऊ लागला आहे. वाचक न वाचता उथळ बोलू लागलेत. महत्त्वाचा वेळ इतरत्र घालवून लिहिण्या– वाचण्यावर जणू काही रेघोट्या मारल्या जातात. ग्रंथ, कादंबऱ्या वाचकाविना धूळ खात पडली आहेत. कपाटातल्या पुस्तकांसह बंद पडण्याच्या मार्गावर असलेली वाचनालय वाचकांच्या प्रतीक्षेत आहेत. वाचनाविना आयुष्य एकांगी उथळ होत चालल्याची जाण कुणाला नाही. दर्जेदार कल्पना, योग्य मतमांडणी, उत्कृष्ट विचार संपुष्टात येत आहे. काही थोडे जण वाचलेले आचरणात आणतात पण अल्पावधीत सोडून देऊन पुन्हा मूळ पदावर येतात. एकवेळ विज्ञान कंदील देईल पण वाचायला तुम्हालाच लागेल ना! पुस्तकी रूपातले प्रश्न, वाचणं आणि वाचवणं किती गंभीर आहे हे आपल्या लक्षात आलं असेल. कवयित्री दीपा मनमुक्त यांची नुकतीच वाचनात आलेली पुस्तकावरची कविता मन सुन्न करते. त्यातली भीषणता हेलावून टाकणारी आहे.पुस्तकांनी केलंय लॉकडाऊन आपल्या कपाटाचं... म्हणतात की आम्ही येत नाही तुमच्या अत्यावश्यक सेवेत, नाहीतरी तुम्ही काय घेतलंत आमच्याकडून? वादांची दुकानं मांडून ठेवलीत तुम्ही नाक्यावर. धर्मग्रंथांतला धर्माचा अर्थही लावत गेलात मतलबानं. इतिहासातून काही शिकण्याऐवजी आम्ही म्हणतो तोच खरा इतिहास म्हणत गेलात तुम्ही. आम्ही सांगत गेलो ज्ञानाची ज्ञानेश्वरी पण तुम्ही भोंदुगिरी केलीत माणुसकीची, संस्कृतीची आणि परमेश्वराचीही... आता तुमच्या सर्वचं वर्तणुकीत कुठे दिसतोय ज्ञानार्जनाचा अंश? घोळक्याघोळक्याने जीवनावश्यक वस्तू घेताना विसर पाडताय नियमांचा. तुमच्याकरता असलेल्या कार्यरत सेवकांचा. टोळीगिरीचं महत्त्वं वाढतयं दिवसागणिक. त्यामुळे तुम्ही खरंच काही नाही मिळवलंय, मला वाचून... आमचीही संख्या विपुल, तसे मतभेदही विपुल. तरी आम्ही मानतो आमच्या विचारांचा सोशल डिसट्रंस. होत नाही आक्रमक शब्दातून शस्त्रातून. एकमेकांना प्रमाण मानून प्रमाणात राहतो आम्ही. पण तुम्ही खरंच काही घेतलंय का आमच्याकडून? त्यामुळे मीचं ठेवू पाहतेय माणसांपासून सोशल डिसटंस... ज्यांना शब्द कळत नाहीत, वाक्यांतला अर्थ कळत नाही, विचारांतील भेद लक्षात ठेऊन एकमेकांच्या विचारांचा आदर करणं समजत नाही अशा वाचकांपासून मी ठेऊ पाहतोय सोशल डिसटंस... कारण... तुकारामांच्या गाथेइतकं बळ नाही उरलंय माझ्यात. जलप्रवाहात पडूनही पतित न होता स्वत:ला पवित्र ठेवण्याचं. एवढं सगळं पाहता येणाऱ्या जागतिक पुस्तक दिनानिमित्त वाचाल तर वाचाल विषयी आपण काय विचार करता...?

# बारामतीच्या सभेत मुख्यमंत्र्यांनी केला अजित पवारांच्या कार्याचा गौरव, सुनेत्रा पवारांसाठी केला जोरदार प्रचार

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवारांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. या पोटनिवडणुकीसाठी बारामतीत महायुतीने सभा घेतली. या सभेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बारामतीत आले होते तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बारामतीत सुनेत्रा पवारांचा प्रचार केला. अजित पवारांची चुलत बहीण या नात्याने खासदार सुप्रिया सुळे यांनीही सुनेत्रा पवारांसाठी प्रचार केला. शरद पवारांनी तब्येतीच्या कारणास्तव प्रचार करणे टाळले पण बारामतीकरांना सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करण्याचे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनीही सुनेत्रा पवारांसाठी प्रचार केला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारसभेत बोलताना अजित पवारांच्या कार्याचा गौरव केला. आठवणींना उजाळा दिला आणि सुनेत्रा पवारांना मतदान हीच अजित पवारांना खरी श्रद्धांजली असल्याचे भावनिक आवाहन बारामतीकरांना केले. एकनाथ शिंदेंनीही कामाचा माणूस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजित पवारांच्या कार्याचा गौरव केला. आठवणींना उजाळा दिला आणि सुनेत्रा पवारांना मतदान करण्याचे आवाहन बारामतीच्या मतदारांना केले.

काल शरद पवारांनी फोन करून आघाडीचा पाठिंबा सुनेत्रा पवारांनाच असल्याचे सांगितले, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीच्या प्रचारसभेत दिली. सभेत बोलताना सुनेत्रा पवारांना जाहीर केलेल्या पाठिंब्यासाठी मुख्यमंत्र्यांनी शरद पवारांचे जाहीर आभार मानले. सुनेत्रा पवार विक्रमी मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रचारसभेत बोलताना व्यक्त केला. अजित पवारांप्रमाणेच सुनेत्रा पवारही ठामपणे राज्याच्या विकासाचा गाडा ओढतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

प्रचारसभेवेळी अजित पवारांवील एक छोटी फिल्म दाखवण्यात आली. ही फिल्म बघताना सुनेत्रा पवारांचे अश्रू दाटून आले होते. अजित पवारांनी बारामतीच्या तीन पिढ्यांना एका कुटुंबासारखं जपलं. राज्याचं काम करणाऱ्या अजित पवारांनी बारामतीविषयीची आपुलकी कायम जपली. अशा या दादा माणसाच्या आकस्मिक जाण्यानं बसलेल्या धक्क्यातून सावरण्यासाठी जशी कुटुंबानं, दोन्ही मुलांनी साथ दिली तशी बारामतीकरांसह पूर्ण राज्यानंही काळजी घेतली. सर्वांनीच माझ्यावर आणि मुलांवर मुलांवर भरभरून प्रेम केले, असे सांगताना राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार भावुक झाल्या होत्या. अजित पवार यांच्या विचारांना उजाळा देताना त्यांच्यासारखेच काम करून दाखवेन, असा विश्वास व्यक्त करत मी संघर्ष योद्ध्याची सहचारिणी असल्याचे सुनेत्रा पवार म्हणाल्या.

# रेवदंड्यात विजांचा थरार! ताडाच्या झाडावर वीज कोसळून आग,मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

रेवदंडा आणि आसपासच्या परिसरात आज सकाळपासून अचानक हवामानात मोठा बदल झाला. प्रचंड विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसाच्या सरींनी नागरिकांची अक्षरशः धावपळ उडवली. अनपेक्षितपणे आलेल्या या पावसामुळे अनेक ठिकाणी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, बागमळा परिसरात पेट्रोल पंपाच्या पाठीमागे असलेल्या उंच ताडाच्या झाडावर वीज कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. वीज पडताच झाडाने तात्काळ पेट घेतला आणि काही क्षण परिसरात ठिणग्यांचा वर्षाव होत असल्याचे भीषण दृश्य पाहायला मिळाले. विशेष म्हणजे, मुसळधार पावसातही झाड काही काळ जळत राहिल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळाजवळच CNG पंप असल्यामुळे संभाव्य धोका ओळखून परिसरात घबराट पसरली होती. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मोठी दुर्घटना घडली नाही. मात्र, या प्रसंगाने स्थानिकांच्या मनात धास्ती निर्माण झाल्याचे दिसून आले.या अवकाळी पावसाचा फटका विविध व्यावसायिक क्षेत्रांनाही बसला आहे. परिसरातील अनेक रिसॉर्टमधील विद्युत सजावटी पावसाच्या पाण्यामुळे निकामी झाल्या. तसेच, काही घरांवरील सुरू असलेल्या बांधकाम साहित्याचे नुकसान झाले. विशेषतः वीटभट्टी व्यवसायिकांचे मोठे नुकसान झाले असून,



भट्ट्यांमधील लाकूड व तयार विटा भिजल्याने उत्पादन पूर्णपणे ठप्प झाले आहे. याशिवाय, काही ठिकाणी सुरू असलेल्या लग्नसमारंभांनाही पावसाचा फटका बसला. मंडप भिजल्यामुळे पाहुण्यांची गैरसोय झाली आणि आयोजकांची धावपळ उडाली.दरम्यान, या पावसामुळे वातावरणात तात्पुरती गारवा निर्माण झाला असला, तरी नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन स्थानिक प्रशासनाने केले आहे. पुढील काही तासांत हवामानात बदल होण्याची शक्यता लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आरोग्यविषयक विविध योजनांच्या एकत्रिकरणासाठी वॉर रूम स्थापन:देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन प्रणालीचे लोकार्पण



**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकरिता विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीचे आज लोकार्पण करण्यात आले. यामध्ये राज्यामध्ये कार्यरत असणाऱ्या आरोग्यविषयक विविध योजनांचे एकत्रिकरण करण्यात येणार असून त्यासाठी प्रथमच राज्यात वॉर रूम स्थापन केली जाणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष केवळ आर्थिक मदतीचा स्रोत न राहता, रुग्ण, रुग्णालये आणि शासन यांना एकत्र आणणारे प्रभावी व्यासपीठ ठरत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या कामकाजाचा आढावा व मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकरिता विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीचे उद्घाटन तसेच राज्यामध्ये कार्यरत आरोग्यविषयक योजनांचे एकत्रिकरण करण्यात येऊन वॉर रूम स्थापन करण्यासंदर्भात सादरीकरण करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सादरीकरणाव्दारे नवीन ऑनलाईन प्रणालीची माहिती दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कर्करोगाच्या उपचारासाठी वापरली जाणारी इम्युनो थेरेपी अतिशय खर्चिक असते. तिचा खर्च सामान्यांच्या आवाक्याबाहेर असतो. या थेरेपीचे एक इंजेक्शन साधारणतः दोन लाख रुपयांच्या घरात असून, उपचाराचा एकूण खर्च जवळपास आठ लाख रुपये असतो. या उपचार पद्धतीचा लाभ राज्यातील गरजू रुग्णांना देण्यासाठी नियोजन करावे .आरोग्य योजनाचा लाभ गरजूना मिळावा, परंतु दुहेरी लाभ टाळल्यास त्याचा लाभ खऱ्या गरजुना जास्त प्रमाणात देता येईल. हा उपक्रम चांगला असून याद्वारे खऱ्या गरजुना मदत करता येईल, त्याचप्रमाणे दुहेरी लाभ देण्याचे प्रकारही टाळता येतील.

# करमाळ्यात आरोग्य जागृतीचा आदर्श उपक्रम बहुदिवसीय आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर । प्रतिनिधी**

आई कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने तसेच कै. डॉ. प्रदीपकुमार (आबा) जाधव–पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य बहुदिवसीय आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दि. ३ एप्रिल ते १७ एप्रिल २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या शिबिरामुळे करमाळा शहर व तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्य संवर्धनाला मोठा हातभार लागला.या शिबिरात सर्वसामान्य तपासणीसह मूळव्याध, किडनी विकार, मुतखडा, प्रोस्टेट ग्रंथीचे आजार, फुफ्फुसांचे विकार (टीबी, दमा), हाडांचे आजार, मेंदूविकार, त्वचारोग, केसांच्या समस्या, दंतचिकित्सा, हृदयरोग तसेच लहान मुलांच्या हृदयरोगांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून सखोल तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. सवलतीच्या दरात तपासण्या व उपचार उपलब्ध



करून दिल्यामुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळाला.

शिबिराचे वेळापत्रक सकाळी ९ ते दुपारी ३ तसेच काही दिवस दुपारी २ ते सायंकाळी ५ असे ठेवण्यात आले होते. नामांकित व अनुभवी डॉक्टरांच्या उपस्थितीमुळे रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळाली. विशेषतः दंत तपासणी, रूट कॅनॉल व दातांच्या कव्हरवरील सवलतींना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.समारोप दिनी (दि. १७ एप्रिल) आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल ६६ रक्तदात्यांनी सहभाग घेतला. रक्तदान हेच श्रेष्ठदान या भावनेतून पार पडलेल्या या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे. रक्तदान शिबिराचे उद्घाटन तहसीलदार शिल्पा ठोकडे व पोलीस निरीक्षक रणजित माने यांच्या हस्ते करण्यात आले.उपलब्ध आकडेवारीनुसार विविध आजारांवरील शिबिरांचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला. यामध्ये मूळव्याध ८७, किडनी व मुतखडा ५४, फुफ्फुसांचे आजार २३, हाडांचे विकार ३५, लहान मुलांचे हृदयरोग २, हृदयरोग २९, केस व त्वचारोग ५८, दंत उपचार २४, मेंदूविकार २७, हृदय तपासणी २५ आणि रक्तदान शिबिरात ६६ नागरिकांचा सहभाग नोंदविण्यात आला.सर्व शिबिरे जाधव–पाटील हॉस्पिटल, अर्बन बँक शेजारी, मेन रोड, करमाळा येथे पार पडली. शिबिर यशस्वी करण्यासाठी सचिव अभिजित पाटील, डॉ. शिवानी पाटील, अजिंक्य पाटील, तात्यासाहेब जाधव, महादेव भोसले, प्रमोद जगदाळे, राहुल जाधव व शीतल पेटकर यांनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी डॉ. रोहन पाटील यांनी सांगितले की, संस्थेमार्फत भविष्यातही विविध सामाजिक, आरोग्यविषयक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येणार असून त्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना होणार आहे. ग्रामीण भागात घराजवळच आरोग्यसेवा उपलब्ध करून देणारा हा उपक्रम एक सकारात्मक आदर्श ठरत आहे.

# नारीशक्ती वंदन विधेयकाच्या समर्थनार्थ भव्य महिला रॅली; हजारो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक वादळ वार्ता**
**बदलापूर । प्रतिनिधी**

नारीशक्ती वंदन अधिनियम (महिला आरक्षण विधेयक) समर्थनात बदलापूरमध्ये भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने मोठा जल्लोष आणि पदयात्रा आयोजित करण्यात आली आहे. लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३% आरक्षण देणाऱ्या 'नारीशक्ती वंदन अधिनियमा'चे स्वागत भाजपा महिला आघाडीकडून करण्यात आले या पदयात्रेत महिलांचा मोठा सहभाग असून, ऐतिहासिक निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले जात आहेत.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात महिलांना विधिमंडळ सभागृहात ३३ टक्के आरक्षण मिळवून देण्यासाठी नारी शक्ती वंदन विधेयक मांडण्यात आला महिला या केवळ लाभार्थी न राहता महिला या देशाच्या धोरणकर्त्या व्हाव्यात यासाठी ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. या ऐतिहासिक विधेयकाला पाठींबा देण्यासाठी नारी वंदन भव्य पदयात्रा रॅली काढण्यात आली होती कार्यक्रमादरम्यान विशेष आकर्षण ठरलेल्या 'स्वाक्षरी भिंती'वर महिलांनी मोठ्या उत्साहाने स्वाक्षऱ्या करून या ऐतिहासिक निर्णयाला पाठिंबा दर्शविला. महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी हा निर्णय महत्त्वाचा असल्याचे मत व्यक्त केले.



# गोदा ते नर्मदा जलयात्रेतून जलसंवर्धनाचा व्यापक संदेश-जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

जलव्यवस्थापन अधिक गतिमान, लोकाभिमुख आणि जनसहभागातून प्रभावी करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या ‘जल व्यवस्थापन कृती पंधरवडा’ उपक्रमाअंतर्गत गोदा ते नर्मदा’ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६’चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. गोदा ते नर्मदा जलयात्रेतून जलसंवर्धनाचा व्यापक संदेश सर्वदूर पोहचवण्याचा संकल्प असल्याची माहिती जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.
जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ‘विचार, वारसा आणि विकास’ या त्रिसूत्रीवर आधारित ही जलयात्रा आयोजित करण्यात आली आहे.
जलसंवर्धनाबाबत जनजागृती, लोकसहभाग आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाची संकल्पना अधिक बळकट करणे हा या जलयात्रेचा मुख्य उद्देश आहे.
मंत्री विखे पाटील म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या दूरदर्शी आणि लोकाभिमुख कारभारातून प्रेरणा घेत राज्यात पाणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येत आहे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केलेली मंदिरांची पुनर्बांधणी, घाट-बारव उभारणी, लघुसिंचन आणि जलसंवर्धनाच्या कामांमधील त्यांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प या यात्रेतून दृढ करण्यात येणार असल्याचेही मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.
पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मस्थान श्रीक्षेत्र चोंडी आणि गोदावरीचे उगमस्थान श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून एकाच वेळी या दोन ठिकाणांहून जलयात्रेचा शुभारंभ २५ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे. त्र्यंबकेश्वर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ होणार असून, या कार्यक्रमास आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थितीत रहाणार आहेत. या कार्यक्रमानिमित्त १०८ कन्यांचे पूजन, गोदामातेचे



पूजन यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.श्रीक्षेत्र चोंडी येथील कार्यक्रमाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे.
२५ एप्रिल रोजी चोंडी येथून निघणारी यात्रा अहिल्यानगर येथे मुक्काम करेल, तर त्र्यंबकेश्वर येथून निघणारी यात्रा नाशिक, सिन्नर आणि संगमनेर मार्गे २६ एप्रिल रोजी शिर्डी येथे एकत्र येणार असून त्यानंतर एकत्रितपणे यात्रा पुढे मार्गस्थ होणार आहे. शिर्डी येथे यात्रेच्या स्वागतासाठी विशेष तयारी करण्यात आली असून, ‘द फोक आख्यान’सह विविध सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि जलप्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.यानंतर २७ एप्रिल रोजी शिर्डी, कोपरगाव, वैजापूर, गंगापूर मार्गे छत्रपती संभाजीनगर व घृष्णेश्वर येथे मुक्काम होईल. २८ एप्रिल रोजी यात्रा कन्नड, चाळीसगाव, धुळे येथे पोहोचेल. पुढे २९ एप्रिल रोजी धुळे ते महेश्वर (मध्य प्रदेश) असा प्रवास करून या जलयात्रेचा समारोप होणार आहे.जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, या यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून या उपक्रमात सहभाग नोंदविण्यात येणार आहे. प्रत्येक ठिकाणी लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांच्या उपस्थितीत जलपूजन केले जाईल आणि हे सर्व कलश शिर्डी येथे एकत्रित करण्यात येतील. जलसंपदा विभागाकडून प्रत्येक टप्प्यावर नियोजनबद्ध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या यात्रेत सुमारे ५०० जलयात्री, वारकरी आणि युवक सहभागी होणार असून, पाणी क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था, सेवाभावी संघटना, शेतकरी, ग्रामस्थ आणि नागरिकांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे. विशेष म्हणजे, यंदाचे वर्ष ‘आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष’ म्हणून घोषित झाल्यामुळे महिलांचा सहभाग वाढविण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.जलसंवर्धन ही काळाची गरज असून, सामूहिक प्रयत्नातूनच राज्याचा जलसंपदा विकास अधिक सक्षम होऊ शकतो असे सांगत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले या जलयात्रा उपक्रमात राज्यातील राज्यातील सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे.

# राघू भैया राऊत हेच खरे स्व.संतोष राऊत यांचे राजकीय वारसदार-चेअरमन गणेश राऊत

**दैनिक वादळ वार्ता**
**नाळवंडी । प्रतिनिधी**

नाळवंडी ग्रामपंचायतची पोटनिवडणूक अंतिम टप्प्यात आले असून दि.२८ एप्रिल रोजी पार पडणार आहे. स्व. संतोष राऊत यांच्या निधनामुळे ही पोट निवडणूक या ठिकाणी घेण्यात येत असून राघू भैया राऊत हे खऱ्या अर्थाने स्व. संतोष राऊत यांचा राजकीय वसा व वारसा व कार्यपद्धतीची प्रणाली ठामपणे विजय झाल्यानंतर चालू शकतात असा विश्वास चेअरमन गणेश राऊत यांनी व्यक्त केला आहे तर वार्ड क्रमांक ३ मधील जनतेने राघू भैया राऊत यांना छत्री या चिन्ह समोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करावे असे देखील आवाहन चेअरमन गणेश राऊत यांनी केलेले आहे.



स्व. संतोष राऊत यांनी वार्ड क्रमांक ३ सह नाळवंडी गावच्या विकासाचे मोठे स्वप्न पाहिलेले होते परंतु नियतीने त्यांना लवकरच हिरावून घेतले तर स्व.संतोष राऊत यांच्याप्रमाणेच कार्य प्रणालीची लकब असलेले रघु भैया राऊत निश्चितच त्यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करतील असा देखील विश्वास चेअरमन गणेश राऊत यांनी व्यक्त केलेला आहे तर सामान्य जनतेने आपल्या घरातील उमेदवार म्हणून राघू भैय्या राऊत यांना मतदान रुपी आशीर्वाद देत आपल्या सेवेची संधी द्यावी असे देखील आवाहन चेअरमन गणेश राऊत यांनी मतदारांना केलेले असून राघू भैया राऊत हेच खऱ्या अर्थाने स्व. संतोष राऊत यांचे राजकीय वारसदार ठरू शकतात अशी देखील भावना गणेश राऊत यांनी व्यक्त केलेली आहे.

# कवी रमेश साळवे यांची ‘आंबेडकर मिशन’गजल चर्चेत

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील भाटवडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच कवी रमेश साळवे यांच्या साहित्यकृतींना वाचकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या कविता विविध मासिकांतून प्रकाशित होणार असून कथा व दलित लेखनही विविध अंकातून प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या लेखनात सामाजिक वास्तव, संघर्ष आणि संवेदनशीलता प्रभावीपणे उमटत असल्याने वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत.नुकतीच त्यांनी लिहिलेली ‘आंबेडकर मिशन’ ही गजल विशेष चर्चेत आली आहे. ही गजल नामांकित गायीका




भाग्यश्री अभ्यंकर यांच्या आवाजात रेकॉर्ड करण्यात आली असून तिचे टायटल ‘वागण्यात भिमाचा आचार पाहिजे’ असे ठेवण्यात आले आहे.ही गजल दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी रमेश साळवे यांच्या युट्यूब चॅनेलवर प्रसारित करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील रसिक श्रोत्यांनी या गजलेला एकदा अवश्य ऐकून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच युट्यूबवर Ramesh Salve सर्च करून गजल ऐकता येणार आसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# आलापल्ली वनपरिक्षेत्रात वनविभागाच्या धडक कारवाईत १२ शिकारी ताब्यात

## वन्यजीव अवयवांसह साहित्य जप्त; कायदेशीर कारवाई सुरू

**दैनिक वादळ वार्ता**
**गडचिरोली । प्रतिनिधी**

आलापल्ली वनपरिक्षेत्रात सामूहिक जंगल गस्ती दरम्यान वनविभागाने मोठी कारवाई करत १२ शिकाऱ्यांना ताब्यात घेतले असून त्यांच्या ताब्यातून वन्यजीवांचे अवयव व शिकारीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ तसेच वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अंतर्गत गुन्हे नोंदविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.
आज दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास जंगलात काही जण शिकारीसाठी लपून बसल्याची माहिती वनविभागाला प्राप्त झाली. त्यानंतर गस्ती पथकाने तत्काळ परिसरात सापळा रचून



पाठलाग केला असता १२ जणांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत शिकाऱ्यांकडून विविध वन्यजीवांचे अवशेष जप्त करण्यात आले.
जप्त करण्यात आलेल्या वन्यजीवांमध्ये पारध केलेले चार शेकरू, एक उडनारी खार, एक हरीनाल पक्षी तसेच घुबड प्रजातीतील पक्षी व इतर अवयवांचा समावेश आहे.
सदर कारवाई ही आलापल्लीच्या उपवनसंरक्षक सौ. दिपाली तळमले व उपविभागीय वन अधिकारी श्री. शिवपाल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी गौरव गणवीर यांच्या नेतृत्वात पार पडली. या मोहिमेत क्षेत्र सहाय्यक श्री. पुन्नमचंद बुधावार, वनरक्षक श्री. दत्ता सुरवसे, श्री. निलेश टेकाम, श्री. सुधाकर सोयाम, वाहन चालक श्री. सुरेश मडावी, चौकीदार श्री. श्याम जंगमवार, श्री. नामाजी मडावी व श्री. देवाजी सलामे आदी उपस्थित होते.
वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने अशा प्रकारच्या अवैध कृत्यांवर वनविभागाचे सतत लक्ष असून पुढील काळातही कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार आहेत. संशयास्पद हालचालींबाबत नागरिकांनी तात्काळ वनविभागास माहिती देण्याचे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी गौरव गणवीर यांनी केले आहे

# मुख्य बाजारपेठेत चौंडेश्वरी मंडळाकडून पाणपोई सुरू




**दैनिक वादळ वार्ता**
**भूम । प्रतिनिधी**

उष्णतेचा वाढता पारा विचारात घेता मुख्य बाजारपेठेत बाहेरगावावरून येणाऱ्या नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय दूर करण्यासाठी व्यापारी बांधव आणि कोष्टी समाज ट्रस्ट - बांधवांच्यावतीने मुख्य मेनरोड येथे पाणपोई सुरू करण्यात आली आहे . या पानपोईचे उद्घाटन देखील जेष्ठ समाज बांधवांच्या हस्तेच करण्यात आले .
रविवार दिनांक २० एप्रिल २०२६ अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर पानपोईचे उद्घाटन करण्यात आले, पाणी पोईसाठी मोठाल्या रांजणातून पाणी नैसर्गिक रित्या थंड व्हावे यासाठी मोठे रांजण उपलब्ध केले आहे, त्याला कपडा देखील गुंडळला आहे, जेणेकरून पाण्याचा थंडावा आणखी वाढावा, याशिवाय मुख्य रस्त्यावर पाणपोईच्या वरती मोठा कपडा देखील टाकलेला आहे - जेणेकरून पाणी स्वच्छ राहील त्यामध्ये घाण जाणार नाही याची देखील मंडळांनी दखल घेतली आहे .
यावेळी आलमप्रभु देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष दिलीप शाळू महाराज , नगरसेवक विठ्ठल बागडे , ज्येष्ठ समाज बांधव पांडुरंग बुगड , आबासाहेब नवले, धनंजय बाबर, धनंजय बागडे , पांडुरंग वरवडे, अंबादास वरवडे , बापू डिसले, संदीप बागडे , शंकर म्हेत्रे, सुभाष उपरे, बाळासाहेब फासे आदींची उपस्थिती होती .

# महात्मा बसवेश्वरांच्या वचनांचे कृतिशील आचरण महत्वाचे-सचिव माधवराव पाटील टाकळीकर

**दैनिक वादळ वार्ता**
**लातूर । प्रतिनिधी**

जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर हे तथागत गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीरानंतरचे द्रष्टे कृतिशील समाजसुधारक होते. महात्मा बसवेश्वरांनी समाजातील अठरापगड जातीला एकत्र करून अनुभव मंटपाची स्थापना केली. तसेच आपल्या वचन साहित्याच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले. त्यामुळे महात्मा बसवेश्वरांच्या वचनांचे कृतिशील आचरण आपण आपल्या दैनंदिन व्यवहारात केले पाहिजे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले.
महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आय.क्यु.ए.सी., जयंती उत्सव समिती आणि ग्रंथालय विभागाच्यावतीने जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी ते सामाजिक परिवर्तनाचा महामेरू: महात्मा बसवेश्वर या विषयावरील विस्तार व्याख्यानात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, संस्थेचे कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, प्राचार्य प्रो.डॉ. सिद्राम डोंगरगे, मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी, पर्यवेक्षक डॉ.गुणवंत बिरादार आणि माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा.कल्याण कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.
यावेळी सर्वप्रथम जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात संगीत विभागातील प्रा.विश्वनाथ स्वामी, प्रा.गोविंद पवार आणि सुरमणी प्रा.सोमनाथ किडिले यांच्या बसव वचन गाऊन झाली.
पुढे बोलताना माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, महात्मा बसवेश्वर हे क्रांतिकारी युगपुरुष होते. बाराव्या शतकात त्यांनी समाजक्रांतीला जन्म दिला. वचन साहित्याच्या माध्यमातून त्यांच्या सामाजिक समतेचा संदेश घरोघरी पोहोचविला. त्यांनी वेद, विविध दैवतांची पूजा, स्पृश्य-अस्पृश्य भेद, वर्णभेद, जातीभेद आणि लिंगभेद या बाबींचा विरोध केला. वेदांना फाटा देत स्त्री-पुरुष समानता निर्माण करून मानवतावादी धर्माचा पुरस्कार केला.
यावेळी प्रा.कल्याण कांबळे म्हणाले की, बाराव्या शतकामध्ये महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वचन साहित्याच्या माध्यमातून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. पुढील आधुनिक काळात महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामध्ये त्यांच्या वचनाचे प्रतिबिंब असल्याचे आपणास दिसून येते असेही ते म्हणाले.
यावेळी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय आणि रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजन यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय प्लास्टिक मुक्त अभियानातर्गत कापडी पिशवी आणि काचेची पिण्याच्या पाण्याची बाटली



उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेट देऊन महाविद्यालय प्लास्टिक मुक्तीचा संकल्प करण्यात आला.
अध्यक्षीय समारोपात आदिनाथ सांगवे म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांनी आपल्या विचार कार्यातून प्रस्थापित व्यवस्थेला जोरदार धक्का दिला. समाजामध्ये क्रांतिकारी विचार रुजवले. महात्मा बसवेश्वरांच्या वचनाचा आधार घेत त्यांनी चोरी करू नका, हत्या करू नका, खोटे बोलू नका, कोप करू नका, इतरांचा तिरस्कार करू नका, आत्मप्रौढी बनू नका आणि हेटाळणी करू नका या सप्तसुत्रीच्या माध्यमातून मनुष्याने आपली अंतरंग आणि बहिरंग शुद्धी करून आपल्या कुडलसंगम देवास प्रसन्न करावे. असेही ते म्हणाले.
या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.रत्नाकर बेडगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.मनोहर चपळे आणि प्रा.किसनाथ कुडके यांनी केले आणि आभार डॉ.धोंडिबा भुरे यांनी मानले.
या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आय.क्यु.ए.सी. समन्वयक प्रो.डॉ.आनंद शेवाळे, ग्रंथालय समिती सचिव डॉ.सदाशिव दंदे, ग्रंथपाल प्रा.प्रमोद सराफे, स्टाफ सचिव प्रा.रवींद्र सुरवसे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, ग्रंथालय आणि जयंती उत्सव समितीतील सर्व सदस्य, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.
या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धरणांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत १०१.७७ टीएमसी अधिकचा पाणीसाठा

## एल-निनोचा प्रभाव लक्षात घेऊन पाणी जपून वापरा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता

मुंबई | प्रतिनिधी

राज्यातील विविध धरणांमध्ये सुमारे ६५३.६३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा १०१.७७ टीएमसी पाणीसाठा अधिकचा आहे. गतवर्षी हा साठा ५५१.८६ टीएमसी होता. मात्र यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पाऊसाच्या अनियमतेतमुळे पुढील वर्षी टंचाईचा मुकाबला करता यावा, यासाठी पाणी जपून वापरा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा आणि एल-निनो प्रभावामुळे संभाव्य परिणामांची माहिती दिली.

एल-निनोच्या प्रभावामुळे पाणीसाठ्यात २०१४ मध्ये १२ टक्के तर २०१५ मध्ये सुमारे १४ टक्के घट झाली होती. त्यामुळे दोन्ही वर्षी पाणीटंचाई निर्माण झाली होती. १५ ऑक्टोबर २०१४ रोजी ८७२ टीएमसी तर याच दिवशी २०१५ ला ६२५ टीएमसी पाणीसाठा होता. त्या तुलनेत २०२५ मध्ये १५ ऑक्टोबरला १३३०.९७ टीएमसी पाणीसाठा होता. हा पाणीसाठा २१ एप्रिल २०२६ रोजी ६५३.६३ टीएमसी आहे. गतवर्षीच्या गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १०१.७७ टीएससी पाणीसाठा अधिकचा आहे. यावर राज्यातील पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून ऑगस्ट २०२६ अखेर पिण्यासाठी पाणी उपलब्ध राहण्याच्या दृष्टीने काटकसरीच्या उपायोजनांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. त्यासोबतच एल-निनोच्या प्रभावामुळे या वर्षी पाऊस कमी होण्याची शक्यता असल्याने पुढील वर्षी पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे या दृष्टीने आतापासून पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी केले.

महसूल विभागनिहाय पाणीसाठा (कंसात धरण संख्या) यंदाचा उपयुक्त पाणीसाठा, गतवर्षीचा पाणीसाठा (टीएमसीमध्ये)

नागपूर - (३८७) ८०.७९, ६३.४०,
अमरावती - (२७६) ७३.७२, ६५.१३.
छत्रपती संभाजीनगर - (९२९) १२९.३७, ९७.०९.
नाशिक - (५३९) १०१.९६, ८९.२८.
पुणे - (७२४) २०६.५५, १७४.०४.
कोकण - (१७३) ६१.२४, ६२.९२.
एकूण - (३०२८) ६५३.६३, ५५१.८६.

राज्यातील प्रमुख धरणांतील पाणीसाठा : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा, गतवर्षीचा पाणीसाठा (टिएमसीमध्ये) या क्रमाने -

कोयना : ३३.६२, ३६.७६ . जायकवाडी : ४२.०३, ३४.४४. उजनी : १३.३९, (०) पेंच प्रकल्प समूह : २६.५७, २६.३५. इसापूर : २१.४५, १७.८२. भातसा : १५.७०, १४.९१. गोसीखुर्द : १४.३१, ५.९३. खडकवासला धरण समूह : ११.३२, ९.८२. मुळा : ९.५४, १०.५३. अप्पर वर्धा : १०.२१, ९.५३. अप्पर वैतरणा : ६.५२, ५.९५, भंडारदरा : ५.२५, ६.०४ टिएमसी.



# अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह लावल्यास कडक कारवाई


## सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक पावरा यांचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

रवींद्र वळवी | मोलगी

अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी बहुल भागात बालविवाह रोखण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने विविध उपाय योजना करत जनजागृती करण्यात येत असली तरी काही ठिकाणी अजूनही अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह होत असल्याचे आढळून येत आहे. या पार्श्वभूमीवर मोलगी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक पावरा यांनी कडक इशारा दिला आहे.

२१ वर्षांखालील मुलगा आणि १८ वर्षांखालील मुलगी यांचे विवाह लावतांना आढळल्यास संबंधितांवर बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ च्या कलम अन्वये २ वर्षापेक्षा अधिक शिक्षा व एक लाख रुपये दंड होऊ शकतो किवा दोन्ही



असे ही त्यांनी स्पष्ट केले आहे. या कारवाईत मुलगा-मुलीचे पालक, विवाह लावून देणारी व्यक्ती, गावपंच, तसेच विवाह सोहळ्यात उपस्थित असलेले नातेवाईक यांचाही समावेश असेल.प्रशासनाकडून वारंवार जनजागृती करुनही काही ठिकाणी बालविवाह होत असल्याने पोलीस यंत्रणा अधिक सतर्क झाली आहे. त्यामुळे मोलगी पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या गावपाड्यांमध्ये असे प्रकार आढळल्यास पोलीस पाटील व नागरिकांनी त्वरित आपत्कालीन क्रमांक १०९८ वर संपर्क करावा असे आवाहन सहा. पोलीस निरीक्षक दिपक पावरा यांनी केले आहे.बालविवाह हा कायद्याने गुन्हा असून समाजाच्या प्रगतीस अडथळा ठरणारा आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने पुढे येऊन असे प्रकार रोखण्यास सहकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी केले आहे.


# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी गुलामीच्या बेड्या तोडून माणसाला माणूस बनविले-पप्पू कागदे

दैनिक वादळ वार्ता

केज | प्रतिनिधी

उपेक्षित समाज आणि स्त्रियांना मनुवादने पशु पेक्षाही हीन समजले होते त्या समाजाला माणूस म्हणून सन्मान आणि अधीकार मिळवून दिले. महाजनांची जयंती केजमध्ये जयभीम महोत्सव साजरा करून होते. दिपक कांबळे युवा मंचच्या वतीने होत असलेला जयभीम महोत्सव आणि त्यांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय असल्याचे गौरव पप्पू कागदे यांनी केला तर दीपक कांबळे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने त्यांचे कार्य हे प्रबोधनाच्याच्या माध्यमातून पोहोचविण्याचे काम राष्ट्रीय प्रबोधनकार राहुल अन्विकर हे करीत असल्याचे सांगितले.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त रिपाइंचे. केज तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली



मार्गदर्याशांखाली राष्ट्रीय प्रबोधनकार राहुल अन्विकर यांचा भीम गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटक पप्पू कागदे तर अध्यक्ष विष्णू भाऊ घुले हे होते. तसेच रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, कार्यालयीन सचिव विष्णू जोगदंड, जिल्हा संघटक रवी जोगदंड यांच्यासह शेकापचे भाई मोहन गुंड, माजी नगरसेवक कपिल मस्के, तालुका सरचिटणीस गौतम बचुटे, ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे, आयटी सेलचे सुरज काळे, हरीश गायकवाड, प्रशांत हजारे, सचिन मस्के, हरेंद्र तुपारे, संभाजी हजारे, दादाराव धेडे, विनोद गायकवाड हे उपस्थित होते. राहुल अन्विकर यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रसंग गीतांच्या माध्यमातून सादर करताना प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले तर माता रमाईच्या जीवनावर प्रबोधन करताना स्त्रियांच्या डोळ्यात अश्रू तरळले.

हा कार्यक्रम दीपक कांबळे युवा मंचचे समन्वयक रणजीत कांबळे आणि त्यांचे सहकारी रोहीत कांबळे, शोयब शेख, प्रदिप शिनगारे, राहुल काळे, निसार शेख, अबुबकर शेख, सुशिल कांबळे, गौतम गंडले, रितेश बचुटे, समाधान तुपारे, संगम कांबळे, सुमित कांबळे, बाळासाहेब कांबळे उत्कर्ष काळे यांच्या सुंदर आणि नेटक्या संयोजनासह संपन्न झाला.उद्घाटन कार्यक्रमाचे संचलन आणि आभार ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे यांनी केले. तर या कार्यक्रमाला केज, केज शहरआणि परिसरातील भीम अनुयायी, महिला या मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

# क्रांतिसूर्य संस्थेचा स्तुत्य उपक्रम चिंचगव्हाण विहाराला बुद्ध मूर्ती भेट

दैनिक वादळ वार्ता

माजलगाव | प्रतिनिधी

क्रांतिसूर्य बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने बौद्ध जयंतीनिमित्त चिंचगव्हाण (माजलगाव) येथील बौद्ध विहारास भगवान गौतम बुद्धांची मूर्ती भेट देण्यात येणार आहे. संस्थेचे प्रमुख विश्वस्त अश्विन टाकणखार व संदेश डोंगरे यांनी ही माहिती दिली.

संस्थेने यापूर्वी सावरगाव व किट्टी आडगाव येथेही बुद्ध मूर्ती भेट देऊन सामाजिक व धार्मिक कार्यात मोलाचे योगदान दिले आहे. या उपक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे यावर्षी बाभळगाव, वडवणी तसेच चिंचगव्हाण येथेही मूर्ती भेट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

हा उपक्रम बौद्ध संस्कृतीची जपणूक, सामाजिक एकात्मता आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी





महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमानिमित्त विशेष पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, मोठ्या संख्येने नागरिक व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून उपक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यात उष्णतेची लाट पशुपालक, व पशु व्यवसायिकांनी जनावरांची काळजी घ्यावी-पशुवैद्यकीय अधिकारी सर्वच चिकित्सालय नायगाव

दैनिक वादळ वार्ता

नायगाव | प्रतिनिधी

जिल्ह्यात सध्या उष्णतेची लाट असून पशुपालक व पशु व्यवसायिकांनी आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी आवाहन नायगांव सर्व चिकित्सालयचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ गोतम खिल्लारे यांनी तालुक्यातील शेतकरी बांधव व पशुपालकांना केले आहे तालुक्यात कुक्कुटपालन, शेळीपालन, वराह पालन, बंदिस्त शेळीपालन, आदी व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहेत एल नेनोपासून आपल्या जनावरांना सुरक्षित ठेवण्यासाठी खालील उपाययोजना कराव्यात आपल्या जनावराची बारकाईने काळजी घेणे उष्णतेपासून बच्चाव होण्यासाठी थंड व



हवेशीर गोठ्यामध्ये जनावरांना राहण्याची व्यवस्था करावी दिवसभरात किमान तीन ते चार वेळेस जनावरांना पिण्याची या पाण्याची व्यवस्था करावी चांगला व पोषण आहार जसे हिरवा चारा पेंड मुबलक प्रमाणात जनावरास द्यावे दिवसातून किमान दोन वेळेस तरी जनावरांच्या पाठीवरती थंड पाण्याने शिंपडावे जनावरांना ज्या शेडमध्ये किंवा गोठ्यामध्ये आपण बांधणार आहोत त्या ठिकाणी क्लींकर ची व्यवस्था करावी किंवा अवतीभवती थंड पाणी शिंपडून घ्यावे जेणेकरून दिवसभर जनावरांना गारवा मिळेल जनावरांच्या हालचालीवर वेळोवेळी लक्ष ठेवावे अशक्त थकवा जनावरात जाणवत असेल तर तातडीने प्राथमिक आरोग्य विभाग यांच्याशी संपर्कात राहावे व त्यावर उपाययोजना कराव्यात असे महत्त्वाचे आव्हान नायगाव येथील कर्तव्यदक्ष पशुवैद्यकीय अधिकारी श्री गौतम खिल्लारे यांनी शेतकरी व पशुपालक बांधवांना याद्वारे आव्हान केले आहे.

# धारावीतील एन शिवराज मैदानात ५५ वा वृक्ष संवर्धन दिन आणि स्वच्छता मोहीम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

मुंबई | दत्ता खंदारे

गेल्या अनेक वर्षापासून ज्या खेळाच्या मैदानाकडे दुर्लक्ष केले जात आहे.अशा धारावीतील एन शिवराजन मैदानात पूर्वीपेक्षा अधिक स्वच्छता हवी, या मागणीसाठी धारावी नागरिक समिती व झोपडपट्टी पोलीस पंचायत बीट नंबर दोन यांच्या माध्यमातून व जी उत्तर उद्यान विभाग तसेच घनकचरा यांच्या सहकार्याने बुधवार दिनांक २२ एप्रिल २०२६रोजी ५६ व्या जागतिक वृक्ष संवर्धन दिनी सकाळी आठ ते अकरा या वेळात मैदानाची स्वच्छता, वृक्षाभोवतीची झाडलोट, दगड मातीचा निचरा,वृक्षांना पाणी,खत तसेच श्री मयूर कांबळे यांच्या माध्यमातून हास्य योगा, नियमित व्यायाम अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विभागातील ज्येष्ठ नागरिक महिला व युवक मंडळी सहभागी झाले होते.



संवर्धन दिनी आयोजित कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक घनकचरा विभाग श्री चंद्रकांत तांबे व कनिष्ठ वृक्ष अधिकारी श्रीमती स्वाती शेवडे यांच्यासह धारावी नागरिक समितीचे प्रमुख मार्गदर्शक दिलीप गाडेकर, अलका साबळे,संदीप ढवळे आणि कनिष्ठ पर्यवेक्षक श्रीमती निरंजना जगताप,मुकादम अशोक येवले व कामगार वर्ग उपस्थित होता. या सर्वांच्या सहकार्यामुळेच वृक्ष संवर्धन दिनाच्या स्वच्छतेचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी किरण खंदारे,अशोक काळे,मीना गौतम, श्री संजय सोनवणे व टीम यांचे सहकार्य लाभले.सदर खेळाच्या उद्यानात नियमावलीचा बोर्ड लावावा,कार्यक्रमानंतर आसपास परिसरातील साहित्य तातडीने उचलावे.दुसऱ्या दिवशी युद्ध पातळीवर स्वच्छता करावी. जे कोण मैदान वापरणार त्यांनीही स्वच्छतेची जबाबदारी घ्यावी अशी मागणी धारावी नागरिक समितीचे संपर्क सचिव श्री दिलीप गाडेकर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# चौसाळा येथे भीम जंयती निमित्त नेत्र तपासणी व आरोग्य तपासणी शिबीर संपन्न



दैनिक वादळ वार्ता

बीड | प्रतिनिधी

विश्वरत्न महामानव बोधिसत्व परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त बीड तालुक्यातील चौसाळा येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रथमतः कुळवाडी भुषण राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस वैधकिय अधिकारी डॉ. अंकुश मंचुके साहेब यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी रुग्णसेवक डॉ. मंगेश मंचुके साहेब, रुग्ण सेवक शैलाताई नाईकवाडे,सामाजिक कार्यकर्ते भारत सुरवसे, चौसाळा ग्रामपंचायत सदस्य आमोल कांबळे, भवानी ग्रुपचे अध्यक्ष सुधाकर गुंजाळ, विठ्ठल झोडगे पाटील,सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विवेक (बाबा)कुचेकर,उपाध्यक्ष विकी ढोकणे, सचिव मिलिंद सोनवणे यांच्यासह अनेक गरजु रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077